अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# सोळावी निवडणूक धोक्याची आणि धक्क्याची

जगातल्या सर्वात मोठ्या लोकशाहीवादी देशातल्या सर्वात मोठ्या निवडणूक प्रक्रियेला सुरुवात होत आहे. कोणत्याही लोकशाही असलेल्या देशात निवडणुका हे त्याचे सर्वात प्रभावी आणि तितकेच लोकमत प्रतिबिंबीत करणारे हक्काचे माध्यम असते. भारतासारख्या अशा मोठ्या देशामध्ये सोळावी लोकसभा स्थापन करण्याकरता राजकीय रणभेरीची गर्जना होत आहे. यंदा एकूण आठ टप्प्यांमध्ये निवडणूक घेण्याचा निर्णय घेऊन निवडणूक आयोगाने अधिक सुसूत्रता आणण्याचे धोरण आखलेले दिसते. काश्मिरपासून कन्याकुमारीपर्यंत आणि इकडे अहमदाबादपर्यंत अतिशय विविध प्रकारच्या भूभागांमध्ये विभागलेल्या या देशात सुरळीतपणे निवडणुका पार पाडणे हे निश्चितच फार मोठे आव्हान असते. आजही सत्तर टक्के भारत हा ग्रामीण भागामध्ये सामावलेला आहे. दुर्गम आदिवासी पहाडी प्रदेशांमधल्या प्रत्येक भारतीयाला आपल्या मतदानाचा अधिकार बजावता यावा यासाठी निवडणूक आयोग कसोशीने प्रयत्न करते यात काही शंका नाही. यंदा देखील सव्वाशे कोटींच्या या देशात यावेळेला ऐंशी कोटी मतदार आपला हक्क बजावू शकतात. संपूर्ण देशात बारा लाख मतदान केंद्रे उभारली जाणार आहेत आणि त्याकरता जवळपास बारा कोटी सरकारी कर्मचाऱ्यांची मदत घेतली जाणार आहे. अशा या लोकशाहीच्या महासंग्रामाचे महापर्व म्हणजे लोकसभा निवडणुका असतात. स्वतंत्र भारतामध्ये आतापर्यंत पंधरा लोकसभा निवडणुका झाल्या यावेळेला सोळाव्या लोकसभेसाठी सव्वापाचशे प्रतिनिधी निवडून देण्याचे काम जनतेला करायचे आहे. एक गोष्ट मात्र यावेळी स्पष्टपणे दिसते. ती म्हणजे यावेळची लोकसभा निवडणूक आतापर्यंत झालेल्या पंधरा निवडणुकांपेक्षा वेगळी होण्याची शक्यता आहे. कारण सगळ्या देशभरात अत्याचार, भ्रष्टाचार, विरोधामध्ये लोकांच्या मनामध्ये तीव्र असंतोष दिसून येतो. तर प्रचंड महागाईने तितकाच संतापही लोकांच्या मनामध्ये निर्माण झाला आहे. यातूनच कुठेतरी परिवर्तनाची लाट आकाराला येत असल्याचे संकेत मिळत आहेत. अन्य पंधरा लोकसभा निवडणुकांपेक्षा यावेळी मतदार अधिक जागृत वाटतो आहे म्हणून मतदानाच्या टक्केवारीतसुध्दा अनपेक्षित वाढ नोंदली जाईल. असाही एक अंदाज दिसून येतो. अर्थातच अजून कोणत्याच राजकीय पक्षाला आपण पूर्ण बहुमत मिळवू शकू, असा आत्मविश्वास वाटत नाही. म्हणूनच ज्याप्रमाणे मनुष्याच्या आयुर्मानामध्ये सोळावं वरीस हे धोक्याचं मानलं जातं. काहीसा तसाच प्रकार ही सोळावी लोकसभा निवडणूकही एका वेगळ्या अर्थाने धोक्याची आणि धक्क्याची ठरली तर आश्चर्य वाटायला नको.

## तंत्र बदलले! मतदारही बदलतील

भारत हा देश आतापर्यंत तरी लोकशाहीवादी म्हणून आपला नावलौकिक टिकवून आहे. भलेही लोकशाहीच्या नावाने भांडवलशाही आणि मूठभर राजकारण्यांची हुकूमशाही जाणवत असली तरी सामान्य माणूस लोकशाहीवादीच असल्यामुळे ते त्याचे फार मोठे चिन्ह ठरते. निवडणूक प्रक्रियेच्या माध्यमातून भारतातल्या शासन प्रशासन व्यवस्थेसाठी लोकप्रतिनिधी निवडून दिले जातात. लोकमताचा काही प्रमाणात का होईना परंतु आदर करण्याची ही प्रथा लोकशाहीचे अत्यंत महत्वाचे लक्षण ठरते. प्रश्न एवढाच आहे की, गेल्या पंधरा–वीस वर्षांमध्ये लोकशाहीला भूषण ठरवणाऱ्या या निवडणुकीमध्ये पुन्हा एकदा प्रचंड प्रमाणावर धनशक्तीचा प्रभाव वाढलेला दिसून येतो. ज्याच्याकडे पैसा तोच निवडणुकीत विजयी होण्याची आशा. असे आज समीकरण तयार झाले आहे. हा पैसा गोळा करण्याकरता शासनयंत्रणेचा वाटेल तसा गैरवापर केला जातो. सत्तेच्या जोरावर पैसा ओरबाडण्याचे कारस्थान खेळले जाते. आज तर पिढ्यान्‌पिढ्या सत्ता आपल्या हातात राहावी, सत्तेच्या माध्यमातून गडगंज पैसा गोळा करता यावा म्हणून पिढीजात राजकीय घराणी आकाराला आली आहेत. गेल्या पंधरा निवडणुकांचा विचार केला तर अनेक मोठ्या राजकीय नेत्यांची नातवंडं, पणतवंडसुध्दा आता निवडणूकीच्या रिंगणात एखाद्या मातब्बर अश्वासारखे उधळताना दिसून येतात. एकीकडे लोकशाहीचा आत्मा ठरणाऱ्या निवडणुकांमध्ये गैरप्रकारांचे प्रमाण वाढावे आणि ते दूर करण्याकरता एकाही राजकीय पक्षाने पुढाकार घेऊ नये. हे आणखीनच खेदजनक ठरले आहे. या अनास्थेतूनच अण्णा हजारेंच्या आंदोलनाला लोकांनी पाठिंबा दिला आणि त्यातून जन्माला आलेल्या आम आदमी पार्टीकडेसुध्दा लोक आता आशेने पाहू लागले आहेत. काळाबरोबर तंत्रज्ञानाचे नवे पर्व आकाराला आले आहे. त्याचा वापर सगळ्याच निवडणूक प्रक्रियेत प्रभावीपणे केला जातो. पूर्वी गावोगाव भिंती रंगवून बॅनर पोस्टर्स लावून मतदानाचे आवाहन केले जात असे. आता थेट मोबाईल, इंटरनेटचा मतदानासाठी प्रभावी वापर केला जात आहे. एकाचवेळी कोट्यवधी लोकांशी संवाद साधला जात आहे. प्रचारपध्दतीमध्ये आलेली ही आधुनिकता राजकीय पक्षांच्या सोयीची असल्याने तरी मतदारांना मात्र या आधुनिक तंत्रज्ञानाचा पाहिजे तितका उपयोग होऊ शकलेला नाही. देशाच्या काही भागात इलेक्ट्रॉनिक मतदार केंद्रे जरी असली तरी निवडणुकांचे तंत्र जर बदलत असेल तर मतदारांच्याही काही अपेक्षा बदलल्या आहेत त्या अनुषंगाने निवडणूक सुधारणांची गरज भासू लागली आहे.

## निवडणूक सुधारणा आवश्यक

यावेळी होत असलेल्या सोळाव्या निवडणुकीसाठी विक्रमी पध्दतीने ईलेक्ट्रॉनिक माध्यमांचा उपयोग होताना दिसतो आहे. अशा बदललेल्या वातावरणात मतदारांनाही बदल अपेक्षित आहे, फक्त आज त्याच त्याच पक्षांच्या आणि त्याच त्याच घराण्यांच्या उमेदवारांना निवडून द्यायची वेळ घरादारांवर असते. राजकारणातल्या या पिढीजात सत्तापिपासूंमुळे लोकशाहीचे नुकसान होते. भ्रष्टाचार प्रचंड प्रमाणात वाढतो. वयाची ऐंशी ऐंशी वर्षे होऊनही निवडणुकांचा मोह सुटत नाही. ही परिस्थिती पंधरा लोकसभा निवडणुका होऊनही कायम असेल तर ती दुर्दैवीच म्हणावी लागेल. खरे तर राजकीय पक्षांनी निवडणूक सुधारणांची ग्वाही दिली पाहिजे. कोणत्याही व्यक्तीला आपल्या संपूर्ण आयुष्यात कोणत्याही दोन निवडणुका लढवण्याचे बंधन घातले पाहिजे. तरच लोकशाहीच्या मुलभूत लोक मताचे विकेंद्रीकरण होईल. अनेकांना संधी मिळण्यापासून ते सत्तेचा मोह टाळण्यापर्यंत त्याचा उपयोग करता येऊ शकेल. यासाठी तरी ही सोळावी निवडणूक नवा धक्का देणारी ठरावी.